# शिवाजी नगर मेट्रो स्टेशन हे पूर्ण झालेले पहिले भूमिगत मेट्रो स्टेशन

## एकूण ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे




हे स्टेशन मल्टी-मॉडल इंटिग्रेशनसह नियोजित आहे. स्थानकांचे प्रवेश/निर्गमन हे शिवाजी नगर रेल्वे स्थानक, PMPML आणि MSRTC बस डेपो आणि हिंजवडी मेट्रो मार्गासह एकत्रित केले आहे.

शिवाजी नगर भूमिगत स्टेशन हे मुख्य रस्त्यापासून 200 मीटर अंतरावर आहे आणि साखर संकुल ते आकाशवाणी भवन (AIR) ला जोडणाऱ्या रस्त्याखाली आहे. स्टेशनशी संबंधित इमारती रस्त्याच्या पातळीवर 200X20 मीटर परिसरात येत आहेत. भूमिगत स्टेशनसाठी खोदलेला रस्ता पूर्ववत केला जाईल. या संपूर्ण परिसराला व स्थानकाच्या क्षेत्रासह छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील परिसराचे स्वरूप आणि अनुभव देण्याचा प्रस्ताव महा मेट्रोने मांडला आहे.

स्थानकाचा दर्शनी भाग छत्रपती शिवाजी महाराजांच्याच्या प्रतिष्ठित वारशाचे चित्रण करेल. छत्रपती शिवाजी महाराज कालीन- किल्ला, जो स्टेशनच्या नावाशी संरेखित होईल, (शिवाजी नगर मेट्रो स्टेशन).



आकाशवाणी (AIR) पुणे आणि शिवाजी नगर रेल्वे स्टेशन येथे जुना मुंबई-पुणे महामार्ग जोडण्यासाठी पादचारी भुयारी मार्ग नेटवर्क. मेट्रो स्थानकापर्यंत पोहोचण्यासाठी दोन भुयारी मार्ग प्रस्तावित आहेत. एक भुयारी मार्ग शिवाजी नगर रेल्वे स्थानकाकडे जातो आणि दुसरा डॉ कपोते जंक्शन येथे प्रवेश/निगमन बदलण्यासाठी जातो.



शिवाजी नगर मेट्रो स्थानकात 5 लिफ्ट असतील ज्यात 3 लिफ्ट बसवण्यात आल्या आहेत आणि 12 एस्केलेटर त्यापैकी 6 बसवण्यात आले आहेत. टनेल व्हेंटिलेशन आणि environmental control system या शेवटच्या टप्प्यात असून कमिशिनिंग साठी तयार आहेत.

शिवाजी नगर येथील रस्ते आणि वाहतूक जंक्शन्सना आधुनिक रूप देऊन पुनर्रचना करण्यात येणार आहे.

महा मेट्रो पुण्यात सुमारे 30 किमी लांबीचे दोन मेट्रो कॉरिडॉर बांधत आहे. कॉरिडॉर-1 (उत्तर-दक्षिण कॉरिडॉर) हा PCMC ते स्वारगेटपर्यंत सुरू होतो आणि कॉरिडॉर-2 (पूर्व-पश्चिम कॉरिडॉर) वनाझ ते रामवाडीपर्यंत 24 किमी उन्नत आणि 5 किमी भूमिगत स्थानकांसह सुरू होतो. प्रकल्पासाठी दोन डेपो नियोजित आहेत, त्यापैकी एक रेंज हिलजवळ आहे आणि दुसरा वनाझ स्टेशनवर आहे.

भुयारी मार्ग कॉरिडॉर-1 चा भाग आहे आणि रेंज हिल डेपोपासून स्वारगेटच्या दिशेने सुरू होतो. शिवाजी नगर, दिवाणी न्यायालय, बुधवार पेठ, मंडई आणि स्वारगेट अशी एकूण पाच भूमिगत स्थानके नियोजित आहेत.

